क्रमांक : १०६५० /क-१,
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,
विधान भवन, मुंबई,
दिनांक : २४ मे, २०२२

**संदर्भ** :- सा.प्र.वि.शा.नि.क्र.- टिआरएन-०९/प्र.क्र.३९/०९/१२-अ, दिनांक २३ सप्टेंबर, २०११

:: **परिपत्रक** ::

लोकसभा सचिवालय, नवी दिल्ली यांच्या संसदीय लोकतंत्र शोध व प्रशिक्षण विभाग (PRIDE), संसदीय कार्य मंत्रालय यांचेकडून "NATIONAL e-VIDHAN APPLICATION (NeVA)", भारतीय लोक प्रशासन संस्था, महाराष्ट्र शाखा, मंत्रालय, मुंबई आणि यशदा, पुणे अशा विविध संस्थामार्फत वेळोवेळी शासकीय अधिकारी / कर्मचारी यांच्या दैनंदिन कामकाजाचा दर्जा उंचावण्याकरिता आवश्यक प्रशिक्षणे अयोजित करण्यात येतात.

सामान्य प्रशासन विभागाच्या संदर्भाधिन शासन निर्णयामध्ये 'अधिकारी / कर्मचारी पायाभूत प्रशिक्षण जोपर्यंत पूर्ण करत नाही तोपर्यंत त्यांना नियमित पदस्थापना न देता परिविक्षाधीन अधिकारी मानण्यात यावे. प्रत्येक ५ ते ७ वर्षाच्या गटात किमान पाच दिवसांचे एक प्रशिक्षण होणे पदोन्नतीसाठी आवश्यक आहे. दरवर्षी वेतनवाढ देताना त्या कर्मचाऱ्यांचे आवश्यक ते प्रशिक्षण पुर्ण केले किंवा कसे याची तपासणी करणे आवश्यक राहिल. वरिष्ठांद्वारे प्रशिक्षणासाठी नामनिर्देशन होऊनसुद्धा संबंधित व्यक्ती अपवादात्मक परिस्थिती वगळता गैरहजर राहिली तसेच सूट मिळण्यासाठी सक्षम प्राधिकाऱ्याकडून मान्यता न घेतल्यास महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम, १९७९ च्या तरतूदीनुसार सक्षम प्राधिकाऱ्याकडून शिस्तभंगाची कार्यवाही करण्यात यावी' असे नमूद करण्यात आले आहे.

या सचिवालयातील अधिकारी / कर्मचारी यांच्या कामाचा दर्जा उंचावण्याकरिता उपरोक्त नमूद विविध संस्थांमार्फत आयोजित करण्यात येणाऱ्या प्रशिक्षण वर्गांकरिता या सचिवालयामार्फत वेळोवेळी नामनिर्देशन करण्यात येते. मात्र, बहुतांश वेळा असे निदर्शनास आले आहे की, नामनिर्देशन केलेले अधिकारी / कर्मचारी वैयक्तीक कारणास्तव सदर प्रशिक्षणास उपस्थित राहणे टाळतात.

या सचिवलयातील सर्व अधिकारी / कर्मचारी यांना अवगत करण्यात येते की, लोकसभा सचिवालय, नवी दिल्ली यांच्या संसदीय लोकतंत्र शोध व प्रशिक्षण विभाग (PRIDE), संसदीय कार्य मंत्रालय यांचेकडून "NATIONAL e-VIDHAN APPLICATION (NeVA)", भारतीय लोक प्रशासन संस्था, महाराष्ट्र शाखा, मंत्रालय, मुंबई आणि यशदा, पुणे आणि अन्य विविध संस्थामार्फत वेळोवेळी आयोजित प्रशिक्षणाकरिता या सचिवालयाकडून नामनिर्देशित करण्यात आलेले अधिकारी / कर्मचारी अपवादात्मक परिस्थिती वगळता सदर प्रशिक्षणास अनुपस्थित राहिल्यास, त्यांच्यावर राज्य प्रशिक्षण धोरणामध्ये नमूद व महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम, १९७९ च्या तरतूदीनुसार कार्यवाही करण्यात येईल.

( अनिल शं.महाजन )
सह सचिव (स) तथा वि.का.अ.
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय

**प्रत माहितीसाठी :-**

१) मा.प्रधान सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय यांचे कार्यालय

२) या सचिवालयातील सर्व अधिकारी/ कर्मचारी

३) या सचिवालयातील सर्व कक्ष

४) संगणक कक्ष, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय